महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव
GOVERNMENT MEDICAL COLLEGE, DHARASHIV
कोविड-१९ इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) ४१३ ५०१
e-mail: deangmcosmanabad@gmail.com

जा.क्र.शावैमधा/स्वीस/ 1184 /२०२५ दि.:08/०४/२०२५

**कार्यालयीन आदेश :-**

विषय :- देणगी समितीमध्ये (CSR) अंशत:बदल करणेबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय क्रमांक: सीएसआर-०९२४/प्र.क्र.३७०/प्रशा-२ दि.१२ सप्टेंबर २०२४
२) जा.क्र.शावैमधा/स्वीस/३७२२/२०२४ दि.: १६/१०/२०२४

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागांतर्गत वैद्यकीय/दंत/आयुर्वेदीक महाविद्यालय व त्यांच्याशी संलग्नीत रुग्णलयाचा दर्जा वृध्दींगत करण्याच्या दृष्टिकोनातून दानशुर व्यक्ती,संस्था,खाजगी संस्था यांच्या मार्फत निधी/देणगी उपलब्ध होण्यासाठी त्याचा विनीयोग करण्याकरीता संदर्भ क्र. ०१ च्या शासन निणर्यामध्ये संस्था स्तरावर सी.एस.आर. कक्षाची रचना व त्यांची कार्ये नमूद करण्यात आली आहे.

त्यानुसार संदर्भ क्र.२ नुसार संस्था स्तरावर देणगी समितीचे गठण करण्यात आले आहे. परंतु सदरील समितीमध्ये प्रशासकीय कारणास्तव बदल करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने संस्था स्तरावर संदर्भ क्र.०१ च्या शासन निणर्यानुसार सी.एस.आर. कक्षाची खालील प्रमाणे पुर्न:रचना करण्यात येत आहे.

| अ.क्र | पद | कक्षातील पद |
|---|---|---|
| १. | मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय | अध्यक्ष |
| २. | संबधीत विषयातील विभाग प्रमुख | सदस्य |
| ३. | प्रशासकीय अधिकारी, महाविद्यालय विभाग व रुग्णालय विभाग | सदस्य |
| ४. | श्री. सुनिल तांबरे, समाजसेवा अधिक्षक | सदस्य सचिव |
| ५. | श्री.महेश अटकळ, समाजसेवा अधिक्षक | सदस्य |

उपरोक्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सूचीत करण्यात येते की, त्यांनी संदर्भ क्र.१ च्या शासन निणर्याप्रमाणे समितीचे कामकाज पार पाडावीत तसेच देणगी समिती व त्यास अनुसरुन वेळोवेळी निर्गमीत करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार प्रमाणे आपली कर्तव्ये पार पाडावीत.

सदर समितीचे कर्तव्य व जबाबदा-या खालीलप्रमाणे असतील-

१. शहरातील नामांकित व्यावसायिक, प्रतिष्ठित नागरिक, मंदिर, संस्थान इत्यादी व्यक्तींना संस्थेसाठी देणगी देण्यासाठी विनंती करणे / प्रोत्साहन देणे.
२. संस्थेच्या विकासासाठी जास्तीत जास्त देणगी जमा करण्यासाठी प्रयत्न करणे.
३. संस्थेचे देणगी संबंधित बँक अकाउंट सांभाळणे.
४. इन्कम टॅक्स अंतर्गत ८० सी योजनेसाठी पात्र असल्याची खात्री करणे, वेळोवेळी अद्ययावत करणे.
५. देणगीची रक्कम खर्च करण्यासाठी नियोजन करणे, संस्थेच्या आवश्यकतेनुसार वस्तू/ उपकरणांची यादी प्राधान्य क्रमाने लावून देणगीदारांकडून देणगी मिळविण्यासाठी प्रयत्न करणे.
६. वेळोवेळी अधिष्ठातांना अहवाल सादर करणे.

डॉ. शैलेंद्र द. चौहान,
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव

प्रति-१. मा. अधिष्ठाता, शा.वै.म. धाराशिव
२. संबंधीत विषयातील विभाग प्रमुख, शा.वै.म. धाराशिव
३. प्रशासकीय अधिकारी, शा.वै.म. धाराशिव.
४. मनिष खंडागळे, समाजसेवक अधिक्षक, शा.वै.म. व रु. धाराशिव
५. सुनिल तांबरे, समाजसेवक अधिक्षक, शा.वै.म. व रु. धाराशिव

प्रत माहितीस्तव सविनय सादर- १) मा.सचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय,मुंबई
२) मा.आयुक्त,वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग ,मुंबई